# प्रेसनोट

दिनांक- २७/१२/२०१८.

## कल्याण-डोंबिवली मनपा येथील प्रभागक्षेत्र अधिकाऱ्यास लाच स्विकारताना अटक

दिनांक २७/१२/२०१८ रोजी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, आय वॉर्ड, प्रभाग समिती क्रमांक-९, येथील प्रभागक्षेत्र अधिकारी **शरद रामचंद्र पाटील**, वय-५८ वर्षे यांना यातील तक्रारदार यांच्याकडून २५,०००/- रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार हे डेव्हलपर असून त्यांचे माणेरे चिंचपाडा या ठिकाणी बांधकाम केलेल्या चाळी अनधिकृत असून त्यावर कारवाई न करण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ८०,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांच्याकडे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन ॲसीबी, ठाणे युनिट यांनी सापळयाचे आयोजन करुन **लोकसेवक शरद रामचंद्र पाटील** यांना तक्रारदार यांच्याकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणून २५,०००/-(पंचवीस हजार) रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्री. आजगावकर, पोलीस निरीक्षक, ॲसीबी, ठाणे हे करीत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ९८२०१७००४१ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- १०६४
२) दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५४२७९७९
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**